क्र. क्रीयुसे/शाक्रीस्पआ/आयोजन/१९-२०/का-४
क्रीडा व युवक सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
दि. ११ मार्च २०२०.

प्रति,

१. विभागीय उपसंचालक, सर्व.
२. जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व.

विषयः- शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळ प्रकारांच्या आयोजनाबाबत.

संदर्भः- १. शासन पत्र क्र.राक्रीधो २०१८/प्र.क्र.७२/क्रीयुसे-२,दि.०३ फेब्रुवारी २०२०.
२. शासन पत्र क्र. राक्रीधो २०१८/प्र.क्र.७२/क्रीयुसे-२, दि. ६ मार्च २०२०.

शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये समावेश असलेल्या काही खेळप्रकारांच्या आयोजनास शासनाने स्थगिती दिलेली होती. वरील संदर्भीय पत्र क्र.१ व २ अन्वये शासनाने स्थगिती दिलेल्या खेळप्रकारांच्या आयोजनाबरोबरच भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या खालील तक्त्यात नमुद केलेल्या खेळप्रकारांच्या आयोजनास शासनाने मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुसार सन २०१९-२० या शालेय वर्षात सदर खेळप्रकारांच्या जिल्हा तसेच विभागीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे, राष्ट्रीय स्पर्धांचा कार्यक्रम तसेच माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शालांत परिक्षांचा कालावधी लक्षात घेऊन संबधीत खेळ संघटनांच्या आर्थीक व तांत्रीक सहकार्याने निश्चीत करावे.

| अ.क्र. | खेळप्रकार | वयोगट | आयोजन स्तर |
|---|---|---|---|
| १ | रोपस्किपींग | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| २ | कुराश | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ३ | टेबल सॉकर | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ४ | हुप कॉन दो | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ५ | ग्रॅपलिंग | १९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ६ | जित-कुने-दो | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ७ | कॉर्फबॉल | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ८ | सिलंबम | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ९ | टेनिस व्हॉलीबॉल | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १० | थांग ता मार्शल आर्ट | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| ११ | युंग-मुं-दो | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | वोवीनाम | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १३ | ड्रॉप रो बॉल | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १४ | रस्सीखेच | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १५ | वुडबॉल | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १६ | लगोरी | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १७ | बीच व्हॉलीबॉल | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १८ | टार्गेट बॉल | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| १९ | टेनिस क्रिकेट | १४,१७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| २० | फुटसाल | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| २१ | पॉवर लिफ्टींग | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| २२ | टेनिसबॉल क्रिकेट | १७,१९ वर्षे मुले व मुली | राष्ट्रीयस्तर |
| २३ | चॉकबॉल | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| २४ | चॉयक्वांदो | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| २५ | फुटबॉल टेनिस | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| २६ | बुडो मार्शल आर्ट | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| २७ | पेट्यान्क्यू | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| २८ | लंगडी | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| २९ | जम्परोप | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| ३० | स्पोर्ट डान्स | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |
| ३१ | म्युझीकल चेअर | १९ वर्षे मुले व मुली | राज्यस्तर |

वरील खेळांच्या शालेय स्पर्धेच्या आयोजनास खालील नमुद अटी व शर्थीच्या अधीन राहुन दिली असल्याने सहभागी खेळाडूंना खालील योजनांचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत, याबाबत खेळाडू व त्यांचे प्रशिक्षक/पालक यांना अवगत करावे.

१. शासकीय तसेच अशासकीय नोकऱ्यांमधील ५ टक्के खेळाडू आरक्षण.
२. क्रीडा गुण सवलत.
३. शिष्यवृत्ती.
४. रोख पारितोषिके.
५. इयत्ता ११वी च्या प्रवेशाकरीता खेळाडू आरक्षण.
६. विविध स्पर्धांसाठी शासनाचे मनुष्यबळ, आर्थीक व तांत्रीक मदत उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

अनुक्रमांक १ ते २२ वरील खेळप्रकारांचा समावेश भारतीय शालेय खेळ महासंघाच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये आहे तसेच अनुक्रमांक २३ ते ३१ वरील खेळप्रकारांचा समावेश भारतीय शालेय खेळ महासंघाच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये नसल्याने सदर खेळप्रकारांचे आयोजन राज्यस्तरापर्यंत करावे व त्याबाबत सहभागी खेळाडू/पालक यांना अवगत करावे.

वरीलप्रमाणे नमुद खेळप्रकारांपैकी ज्या खेळप्रकारांच्या राष्ट्रीय स्पर्धांचे सन २०१९-२० मधील आयोजन पार पडले आहे अशा खेळप्रकारांचे आयोजन राज्यस्तरापर्यंत करावे. स्पर्धांचा कालावधी निश्चीत करताना खेळाडू विद्यार्थी परिक्षा कालावधीमुळे स्पर्धेपासुन वंचित राहणार नाहीत याचीही दक्षता घ्यावी. तसेच सद्यस्थितीत काही जिल्ह्यामध्ये  शालेय क्रीडा स्पर्धांची प्रवेश प्रकीया ऑनलाईन प्रक्रीयेद्वारा राबविण्यात येत असुन, सदर स्पर्धांची ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया राबविणे शक्य नसल्यास ऑफलाईन प्रक्रीया राबवून विविध स्तरावरील आयोजन पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

13-03-20

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त
क्रीडा व युवक सेवा,म.रा. पुणे.

प्रत माहीतीस्तव सादर.

१. मा.उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई.
२. अध्यक्ष/सचिव, ३१ खेळप्रकारांच्या एकविध खेळ राज्य संघटना.